# रे.दि.मु.नं.३७/२०१९ मधील नि.२५ वरील आदेश

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० नुसार व आदेश ६ नियम १७ नुसार दाखल केलेला आहे.

२) वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्रं.३ यांना दाव्याचे समन्स काढले असता नाव व पत्ता चुकीचा असल्याने ते बजावले नाही. दावा दाखल करताना नजरचुकीने टायपिंगमध्ये चुक झाल्याने प्रतिवादी क्रं.३ चे नावात चुक झाली आहे व गैरसमजुतीने चुकीचा पत्ता लिहला गेला आहे. तसेच प्रतिवादी क्रं.५ हिचे लग्नानंतरचे नाव व पत्ता बदलला असल्याने व त्या देखील दाव्यात दिलेल्या पत्त्यावर रहात नसल्याचा अहवाल आल्याने त्यांचे नावात व पत्त्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्रं.३ हिचे नाव 'हिराबाई' यास काट देवुन त्याठिकाणी 'विठाबाई' अशी दुरुस्ती व तिचे नावाखाली रा.मु.पो.गवडी, ता.जावली, जि.सातारा असा पत्ता लिहण्यास व दुरुस्ती करण्यास परवानगी असावी. तसेच प्रतिवादी क्रं.५ हिचे नावापुढे 'उर्फ लिलाबाई विष्णु कदम, रा.३६७, गुरुवारपेठ, सातारा, जि.सातारा' आणि प्रतिवादी क्रं.५ नंतर प्रतिवादी क्रं.६ म्हणुन 'श्रीमती हिराबाई काशिनाथ जाधव, वय वर्षे ५०, धंदा–घरकाम, रा.मु.दहयाट, पो.वयगाव, ता.वाई, जि.सातारा' आणि त्यानंतर दावा कलम १० मधील वरुन तिसऱ्या ओळीतील '५' या अंकास काट देवुन त्याठिकाणी '६' अशी दुरुस्ती दाव्याच्या सरनाम्यात करण्यास परवानगी असावी. म्हणुन अर्ज असे.

३) सदर अर्जास प्रतिवादी क्रं.१ यांनी नि.२९ कडे म्हणणे देवुन तीव्र विरोध दर्शविला व असे कथन केले की, अर्जातील कथने खोटी आहेत. त्यावर कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल नाही. मागितलेली दुरुस्ती गुंतागुंतीची आहे. सदरची दुरुस्ती ही टंकलेखनातील दोष अशा स्वरुपाची नाही. त्यामुळे केवळ मोघम कथनाचे आधारे वादीस सदरची दुरुस्ती मागता येणार नसल्याने सदरचा अर्ज रद्द करण्यात यावा.

४) अर्ज व म्हणणे वाचले. वादींतर्फे ॲड. हिरवे व प्रतिवादींतर्फे ॲड. शेटे यांचा युक्तीवाद ऐकला. सोबतचे प्रतिज्ञापत्र पाहिले. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० व आदेश ६ नियम १७ च्या तरतुदी पाहिल्या. एकंदरीत मागितलेली दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असल्याने दावा सदयस्थितीला नि.५ कडील युक्तीवादासाठी म्हणुन नेमलेला आहे. तसेच प्रतिवादी क्रं.६ यांना दाव्याकामी दाखल केल्यास दाव्याकरीता त्या

आवश्यक अशा पक्षकार असल्याने दाव्याचा गुणावगुणावर न्यायनिर्णय होणे गरजेचे आहे. करीता सदर अर्जाच्या कलम ३ मध्ये पोटकलम अ, ब, क, ड नुसार मागितलेली दुरुस्ती आणि प्रतिवादी क्र.६ यांना सामील करुन घेतल्यास प्रतिवादी यांचेवर कोणताही पुर्वग्रहदुषीत असा अन्याय होणार नाही. उलट दुरुस्तीस मंजुरी दिलेस दावा पुर्णतः गुणावगुणावर चालेल. त्यामुळे अर्जाच्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे मी आदेश पारीत करीत आहे –

## आ दे श

(१) अर्ज नि.२५ मंजुर करण्यात येत असुन वादीने अर्जाप्रमाणे दुरुस्ती दाव्याच्या सरनाम्यात करावी.

(२) वादीने दावा दुरुस्ती प्रत १४ दिवसांचे आत दाखल करावी.

दिनांक – २९/११/२०१९
महाबळेश्वर

(शैलेश उ. कंठे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
महाबळेश्वर.